# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

### कार्यपत्रिका क्रमांक - १२
### सभावृत्तांत

दिनांक - २८.६.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा गुरुवार दिनांक २८.६.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा)टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.जम सोनाली पोपट
७) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८) मा.पाडाळे निता विलास
९) मा.जावेद रमजान शेख
१०)जगताप नवनाथ दत्तु
११) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१२)मा. भोसले राहुल हनुमंतराव
१३) मा.चोंधे आरती सुरेश
१४)मा.भालेकर अरुणा दिलीप
१५) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१६)मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा. गायकवाड,मा.दुरगुडे - सह आयुक्त,मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण,मा.कांबळे - सह शहर अभियंता, मा. डॉ.जगदाळे, प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.साळवे - वैद्यकीय अधिकारी, मा.दुधेकर, मा.जाधव, मा.जाधव, मा.चिंचवडे, मा.चौधरी, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.थोरात - कार्यकारी अभियंता,मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी मा.ओव्हाळ प्रशा.अधिकारी -शिक्षणमंडळ,मा.पाटिल - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक : २४) महानगरपालिका क्षेत्र व संरक्षण विभागाचे क्षेत्र यामधील हद्द निश्चीत करणेबाबत..

विषय क्रमांक : २५) पुणे येथे झालेल्या प्रदर्शनात सहभागी होणेबाबत..

विषय क्रमांक : २६) चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र देखभाल व दुरुस्तीबाबत..

विषय क्रमांक : २७) अपंग कल्याणकारी योजना राबविणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २८) वैद्यकिय अधिकारी पदावर कार्यरत असणा-या डॉक्टर्सना सहा महिने मानधनावर नेमणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : २९) महानगरपालिकेच्या शाळा,इमारती, पाण्याची टाकी इ.ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा बसविणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३०) मुख्य समन्वयक/पर्यवेक्षक वर्ग श्रेणी - ३ माध्यमिक पद निर्माण करणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३१) उद्यान देखभाल व संरक्षणकामी देणेबाबत.. ..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३२) उद्यान देखभाल व दुरुस्तीबाबत..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३३) वेतनातील तफावत दूर करणेबाबत.. ..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३४) मानधनावर नेमणुक देणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

--------

दिनांक १९/६/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक - ६५८ विषय क्रमांक - १
दिनांक - २८/६/२०१२
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.रामदास बोकड,मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव..
विषय :- पवळे व्यायामशाळा द.म.सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६५९ विषय क्रमांक - २
दिनांक - २८/६/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भः- मा. निलेश पांढरकर,मा. शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव..
विषय :- कै. मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा चिंचवड पुणे ३३ ही व्यायामशाळा, जय मातृभूमी युवा मंच चिंचवड ही संस्था दरमहा सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत..

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६६० विषय क्रमांक - ३
दिनांक - २८/६/२०१२ विभाग :- स्थापत्य
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१/कावि/७५०/२०१२ दि.११/६/१२
विषय :- निगडी सेक्टर क्र.२२ येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६६१ विषय क्रमांक - ४
दिनांक - २८/६/२०१२ विभाग :- स्थापत्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/लेखा/१/कावि/२४५/२०१२ दि.११/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५५/२०११-१२ मधील अ.क्र.२ अन्वये, प्राधिकरण ४५ मी स्पाईन रोडवरील दुभाजक मध्ये कर्बिंग व चेनलिंक फेन्सींग करणे व इतर कामे करणेकामी मे.देशमुख & कंपनी (नि.र.रू.७७,९३,६१२/- [र.रू.सत्याहत्तर लाख त्र्यान्नव हजार सहाशे बारा] पेक्षा १३.५१ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा अटी

प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६६२ विषय क्रमांक - ५
दिनांक - २८/६/२०१२ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/१६३/२०१२ दि.१३/६/१२
विषय :- मनपाच्या विविध विभागासाठी आवश्यक छपाई साहित्य छपाई करून पुरवठा करणेबाबत..

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६६३ विषय क्रमांक - ६
दिनांक - २८/६/२०१२ विभाग :- वाय सी एम एच
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएचं/१/कावि/११६/२०१२ दि.१४/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रूग्णालयाच्या फिजोओथरेपी विभागातील उपकरणे दुरुस्ती उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.स्पेक्ट्राविजन मेडिटेक यांचेकडून प्राप्त झालेल्या दरपत्रकाचे आधारे थेट पध्दतीने निविदा न मागविता करून घेणेकामी करारनामा करणेस व त्यासाठी येणाऱ्या र.रू.२१,०००/- [र.रू.एकवीस हजार फक्त] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६६४ विषय क्रमांक - ७
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- वाय सी एम एच
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएचं/१/कावि/११७/२०१२ दि.१४/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.रूग्णालयाच्या ऑपरेशन थिएटरमधील डोळ्याचे शस्त्रक्रियेकरिता आवश्यक उपकरण फेको मशिनची दुरुस्ती (ॲक्सेसरीज बदलणे) उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.टेक्नोव्हिजन इंडिया प्रा.लि. यांचेकडून प्राप्त झालेल्या दरपत्रकाचे आधारे थेट पध्दतीने निविदा न मागविता करून घेणेकामी करारनामा करणेस व त्यासाठी येणाऱ्या र.रू.२८,१२५/- [र.रू.अठ्ठावीस हजार एकशे पंचवीस] + जकातचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक - ६६५ विषय क्रमांक - ८
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- नागरवस्ती विकास योजना
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भः- मा. अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/५/कावि/५२/२०१२ दि.१३/६/१२

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मागासवर्गीय कल्याणकारी योजनेच्या घटक योजना क्र.१ अंतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी मधील विद्यार्थ्यांना र.रू.७५०/- व ८ वी ते १० वी विद्यार्थ्यांना र.रू.१,२५०/- प्रमाणे एकत्रित र.रू.१५,९१,७५०/- [र.रू.पंधरा लाख एक्यान्नव हजार सातशे पन्नास फक्त] शिष्यवृत्ती अदा करावी लागणार असल्याने सदर खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६६६ विषय क्रमांक - ९
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- स्थापत्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भः- मा. शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/१/कावि/४/२०१२ दि.१६/६/१२
विषय - वॉर्ड क्र.२६ मध्ये महात्मा फुलेनगर येथील खिरा रोडचे रस्त्याच्या बाजूने उर्वरित ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६६७ विषय क्रमांक - १०
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- स्थापत्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/१/कावि/५/२०१२ दि.१६/६/१२

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.G४B/०६/१९४/ २०११-१२ मधील अ.क्र.५० अन्वये, वॉर्ड क्र.२३ मध्ये गुळवेवस्ती अंतर्गत ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे व अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.व्ही.ए.झोंबाडे (नि.र.रू. १८,६५,६८२/- [र.रू.अठरा लाख पासष्ट हजार सहाशे ब्याऐंशी] पेक्षा १५.०४ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१६,६४,३३७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६६८ विषय क्रमांक - ११
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१०/कावि/१६४/२०१२ दि.१८/६/१२
विषय - मनपाचे वाहनांकरिता टायर्स व ट्युब खरेदीबाबत...

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६६९ विषय क्रमांक - १२
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- स्थापत्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/लेखा/१/कावि/उद्यान/२५२/२०१२ दि.१८/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५५/२०११-१२ मधील अ.क्र.१ अन्वये, मोरवाडी वॉ.क्र.३५ येथील कापसे उद्यानाची सिमाभिंत बांधणे (उद्यान विकसीत करणे) कामी मे.तावरे कन्स्ट्र. कंपनी (नि.र.रू.१,२४,१६,१४७/- [र.रू.एक कोटी चोविस लाख सोळा हजार एकशे सत्तेचाळीस] पेक्षा १५.१० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७० विषय क्रमांक - १३
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- मुख्य लेखा परिक्षक
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भः- मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/६९४/२०१२ दि.१५/६/१२

मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र घ्अङ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७१ विषय क्रमांक - १४
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- निवडणुक
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.निवडणुक/१/कावि/३५६/२०१२दि.१८/६/१२
विषय - सार्वत्रिक निवडणूक २०१२ चे कालावधीत प्रस्तावात नमुद निवडणूक विषयक कामकाजाबाबत..

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावृ

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक - ६७२ विषय क्रमांक - १५
दिनांक - २८/६/२०१२ विभाग:- नगरसचिव
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.प्रभारी नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/७६२/२०१२दि.१६/६/१२

मा.प्रभारी नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र घअङ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७३ विषय क्रमांक - १६
दिनांक - २८/६/२०१२ विभाग:- दूरसंचार
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/१/कावि/४७/२०१२दि.१९/६/१२
विषय :- मनपा माध्यमिक विद्यालये व मनपा इतर कार्यालयात दूरध्वनी व इंटरनेट सुविधा पुरविणेबाबत..

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७४ विषय क्रमांक - १७
दिनांक - २८/६/२०१२ विभाग:- मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/२७५/२०१२दि.१८/६/१२
विषय :- मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाच्या बायो मेडिकल इंजिनिअर विभागाकरीता आवश्यक लागणारे साहित्य (Spare Parts) खरेदीबाबत..

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७५ विषय क्रमांक - १८
दिनांक - २८/६/२०१२ विभाग:- आरोग्य मुख्य
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/४/कावि/३०८/२०१२दि.१९/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सौरक्षणार्थ तातडीची बाब म्हणून पेस्ट कंन्ट्रोल करणे आवश्यक असल्याने मे.श्री.पेस्ट कंन्ट्रोल सर्व्हीसेस यांनी कोटेशनव्दारे दिलेले दर हे सर्वात कमी असल्याने मे.श्री.पेस्ट कंन्ट्रोल सर्व्हीसेस यांचेकडून वाय.सी.एम. रूग्णालय व त्या परिसरामध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी प्रति महा र.रू.१६,९६६/- याप्रमाणे ३ महिने कालावधीसाठी करारनामा करून काम करणेस व त्याकामी येणाऱ्या र.रू. ५०,८९८/- [र.रू.पन्नास हजार आठशे अठ्ठ्यान्नव] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक - ६७६ विषय क्रमांक - १९
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- ब प्रभाग
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.बप्र/९/कावि/२६/२०१२दि.१९/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग कार्यालय जनगणना-२०११ चे कामकाज खर्चासाठी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.जनगणना/१/कावि/१६१/१० दि.३०/४/२०१० अन्वये र.रू.५०,०००/- व आदेश क्र. जनगणना /१/कावि/४४३/११ दि.१९/१/२०११ अन्वये र.रू.५०,०००/- असे एकूण र.रू.१,००,०००/- स्थायी अग्रीमधन मंजूर करण्यात आले असल्याने एकूण र.रू.१,००,०००/- [र.रू.एक लाख] स्थायी अग्रीमधन झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७७ विषय क्रमांक - २०
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- वायसीएम
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मऔभां/१/कावि/१६०/२०१२दि.२०/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दवाखाने/रूग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या औषधे/साहित्य खरेदीकामी २ वर्षाकरिता मागविणेत आलेल्या ई-नि.क्र. २३/२०११-१२ मधील Allopathic Medicine Purchase २३/१, Surgical Item Purchase २३/२, Ayurvedic Medicine Purchase २३/३ निविदा प्राप्त लघुत्तम दरानुसार खरेदीकरणेकामी प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ मधील लघुत्तम निविदाधारकांबरोबर करारनामा करून होणारी अनामत रक्कम भरून घेणेस व मंजुर दरानुसार औषधे/साहित्य खरेदीकामी येणाऱ्या र.रू.९ कोटीचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७८ विषय क्रमांक - २१
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- स्थापत्य
सुचक :- मा.छाया साबळे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भः- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/१२६/२०१२दि.२०/६/१२
विषय :- वॉर्ड क्र.५ मोरेवस्ती मध्ये स्टॉर्म वॉटर डिझाईन प्रमाणे बंद पाईप नाल्याचे बांधकाम करणेबाबत..

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६७९ विषय क्रमांक - २२
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- पर्यावरण अभियांत्रिकी
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि/२१६/२०१२दि.२०/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र. ०४/ENV/०३/२०११-१२ अन्वये, सांगवी, पिंपळेनिलख व कासारवाडी येथील मैलाशुध्दीकरण केंद्रासाठी क्लोरीन गॅसचा पुरवठा करणे बाबतच्या कामासाठी मे.रंगरसायन यांचे सुधारित निविदा दर (नि.र.रू.२८,१०,८२४/- म्हणजेच प्रति मेट्रीक टन १६,३४२/-) पेक्षा २७,९५,०००/- म्हणजेच प्रति मे.टन र.रू. १६,२५०/- इतका कमी असा येत असल्याने तसेच कामाची निकड व तातडी लक्षात घेता मे.रंगरसायण यांची र.रू.२७,९५,०००/- (म्हणजेच प्रति मे.टन र.रू.१६,२५०/-) रक्कमेची निविदा मंजूर करणेस व त्याप्रमाणे निविदा अटी व शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

ठराव क्रमांक - ६८० विषय क्रमांक - २३
दिनांक - २८/६/२०१२ विभागः- विद्युत मुख्य कार्यालय
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भः- मा.सहशहर अभियंता (वि/यां)यांचे जा.क्र. वि/मुका/४/कावि/३६२/ २०१२ दि.२१/६/१२

मा.सहशहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/११-१२ मधील अ.क्र.७ अन्वये, मनपाच्या उद्यानातील उद्घाटन, भूमिपुजन, जयंती, पुण्यतिथी व अनुषंगिक कार्यक्रमाकरीता स्पिकर व्यवस्था करणेकामी मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर अँड इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू. ५,९५,२२७/- [र.रू.पाच लाख पंच्यान्नव हजार दोनशे सत्तावीस] पेक्षा १.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक -६८१ विषय क्रमांक - २४
दिनांक - २८/६/२०१२ विभाग -नगररचना
सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/पि.सौ./ड-२/८३/२०१२ दि.२६/०६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

महानगरपालिका क्षेत्र व संरक्षण विभागाचे क्षेत्र यामधील हद्दीमध्ये ज्याठिकाणी संदिग्धता आहे त्या ठिकाणी संयुक्त मोजणी करुन हद्द निश्चित करणेकामी संपुर्ण संयुक्त मोजणी फी र.रु. ७,३८,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ६८२ विषय क्रमांक - २५
दिनांक - २८/६/२०१२ विभाग - पर्यावरण
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा. निता पाडळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि/२२८/२०१२ दि.२५/०६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

दि. ५ व ६ जुन २०१२ रोजी पुणे येथे झालेल्या Indian Municipal Vision २०२० या प्रदर्शनात पिंपरी चिंचवड महानगरपालिका सहभागी झाल्याबाबत मे. WECOM (WORLD EXPO AND CONVENTIONS MANAGEMENT lTD) यांनी सादर केलेल्या र.रु. ८०,८९९/- च्या खर्चाचे बिल अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६८३ विषय क्रमांक -२६
दिनांक - २८/६/२०१२ विभाग -पर्यावरण
सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/कावि*२३१/२०१२ दि.२५/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV/०९/२०११-१२ अन्वये, चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा १ व २ ची ३ वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.एच.एन.ब.इंजि.प्रा.लि. यांची २३.७ % जास्त म्हणजेच टप्पा १ व २ या दोन केंद्रासाठी ३ वर्षाकरीता एकत्रित र.रु. १,६०,०८,४३४/- निविदा मंजूर करणेस व त्याप्रमाणे निविदा अटी व शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६८४ विषय क्रमांक - २७
दिनांक - २८/६/२०१२
सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अपंग कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामधील मा.महापालिका सभा ठराव क्रमाक ९४४ दिनांक २३/७/२०१० अनवये घटक योजना क्र. ७ च्महापालिका क्षेत्रातील१८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणा-या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्यछ यामध्ये च्१८ वर्षावरील मतिमंद व्यक्ती प्रमाणेच वयवर्षे ५ ते १८ वयोगटातील मतिमंद बालक/व्यक्ति यांना देखील वार्षीक र.रु. १२०००/- ( अक्षरी रक्कम रुपये बारा हजार फक्त) अर्थसहाय्यछ अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६८५ विषय क्रमांक - २८

दिनांक - २८/६/२०१२

सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा. निता पाडळे

संदर्भ:-मा.सुषमा तनपुरे व मा.निता पाडळे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामध्ये विविध रुग्णालयामध्ये रजा राखीव वैद्यकीय अधिकारी या पदावर खालील वैद्यकीय अधिकारी गेली चार ते आठ वर्षापासुन कार्यरत आहेत वस्तुतः या पदावर काम करण्यास कोणीही वैद्यकीय अधिकारी तयार होत नाही त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या खालील वैद्यकीय अधिकारी गेली चार ते आठ वर्षे प्रामाणिकपणे काम करीत आहेत.

१) डॉ.दिपक गंगाधर पखाले आठ वर्षे कार्यरत
२) डॉ.प्रमोद अनंतराव पाथरे चार वर्षे कार्यरत
३) डॉ.शशिकांत सोनवणे चार वर्षे कार्यरत

तरी वरील वैद्यकीय अधिका-यांना महापालिका सेवेमध्ये सहा महिने मानधनावर घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६८६ विषय क्रमांक - २९

दिनांक - २८/६/२०१२

सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

वीज पडून होणा-या मृत्युचे प्रमाण कमी करणेसाठी अंतरीम उपाययोजना म्हणून वीज अटकाव यंत्रणा (Lightening Arrester) उभारण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्र. डीएमयू-२००७/सीआर-२२८/डीएम-१ दि. ९/५/२००८ अन्वये निर्देशजारी केले आहेत. याच अनुषंगाने मा.महापौर यांनीही त्यांचे पत्रान्वये सर्व विभागांना अटकाव यंत्रणा (Lightening Arrester) उभारण्याबाबत कार्यवाही करणेच्या सुचना दिल्या आहेत. सदरकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व इमारती, शाळा, पाण्याच्या टाकी इत्यादी अंदाजे २५० ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा (Lightening Arrester) बसविणे आवश्यक असल्याने त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक - ६८७ विषय क्रमांक - ३०

दिनांक - २८/६/२०१२

सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे

संदर्भ:-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाचे अंतर्गत १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. माध्यमिक विद्यालयांचे वाढते कामकाज तसेच अन्य विभागाशी सतत संपर्क राखणे, मनपा परिसरात स्थलांतर व नैसर्गिक वाढीने विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे. सर्व शिक्षा अभियान,

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षणा अभियान, शिक्षणाचा बालहक्क कायदा यामुळे माध्यमिक शिक्षण विभागाचे कामकाज वाढले आहे. तसेच शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, जि.प.पुणे, एस.एस.सी. बोर्ड या विभागाशी संबंधित कामकाज, माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यावर नियंत्रण ठेवणे इ. कामकाज करावे लागते. शिक्षक प्रशिक्षण व मनपा कडील प्रशासकीय कामकाज, मा.शिक्षणाधिकारी यांच्या सूचने प्रमाणे करता येईल. याशिवाय मनपा चे इतर विभागाची महत्वाचे व तातडीचे कामे सोपविता येतात.वरील प्रमाणे माध्यमिक शिक्षण विभागासाठी शिक्षण विभागाचे कामकाज करणे सोईचे होईल. महाराष्ट्र शासन प्राथमिक शिक्षण परिषद यांच्याकडील दि. ३०/०७/२००५ चे पत्र व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील दि. ३०/०६/२०१० च्या शासन निर्णयानुसार पदाचे कामकाज नमूद केले आहे. तथापि या सर्व कामावर आवश्यक ती देखभाल व अंमलबजावणी करिता मुख्य समन्वयेक/पर्यवेक्षक वर्ग श्रेणी-३ माध्यमिक या अभिनामाचे ०१ पद, वेतन बॅन्ड र.रु. ९३००-३४८०० ग्रेड पे र.रु. ४८०० व मनपा फिरती कर्मचा-याप्रमाणे कि.मी. नुसार त्यांना कामकाजापोटी वाहन फिरती भत्ता देया राहील तसेच त्यांचे वेतन व भत्ते माध्यमिक शिक्षण विभागाच्या मुख्य कार्यालयाने अदा करावेत तसेच त्यांने माध्यमिक शिक्षण विभागाच्या मुख्य कार्यालयात कामकाज करावे. उपरोक्त वेतनश्रेणीत निर्माण करणेस आणि सहाय्यक शिक्षक/ समन्वयक माध्यमिक पदाची सेवा ज्येष्ठता, शैक्षणिक पात्रता,प्रशासकीय कामकाजाचा अनुभव विचारात घेता मा.आयुक्त यांच्याकडील आदेशान्वये त्यांची नेमणूक केलेली होती, समन्वयक माध्यमिक या पदावर कार्यरत असलेले श्री.रंगनाथ गजानन जाधव यांना मुख्य समन्वयक/पर्यवेक्षक वर्ग श्रेणी-३ माध्यमिक या पदावर शासनाच्या उमेदमान्यतेवर पदोन्नती देणेस आणि तसे आदेश निर्गत करणेस व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता सदर पदास शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६८८ विषय क्रमांक - ३१

दिनांक - २८/६/२०१२

सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे

संदर्भः-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

खाली नमूद केलेल्या संस्थेस त्यांचे नावासमोर दर्शविलेले उद्यान ३ वर्ष कालावधीकरीता योग्य त्या अंशतः सेवा शुल्क तत्वावर देखभाल संरक्षणाकामी देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

१. देवीबाई नारायण कापले उदयान-- भगवती स्वयंरोजगार सेवा सह.संस्था
२. साईकृष्ण उद्यान -- माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
३. शिवाजी पार्क प्रतिष्ठाण-- माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
४. बौध्द विहार-- माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
५. रायरेश्वर प्रतिष्ठाण-- माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
६. श्रीकृष्ण मंदीर उद्यान - माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
७. विध्दार्थ गौतम बुध्द उद्यान--माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
८. सिध्दीविनायक मंदीर उद्यान--माउली बेरोजगार सेवा सह.संस्था
९. शाहू उद्यान बिजलीनगर-- बिजलीनगर युवा प्रतिष्ठान

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६८९ विषय क्रमांक - ३२
दिनांक - २८/६/२०१२
सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे
संदर्भः-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

शाहूनगर, चिंचवड येथील राजर्षी शाहू उद्यान हे उद्यान देखभालीचा पुर्वानुभव विचारात घेता, “घर कन्स्ट्रक्शन” या संस्थेस मनपाच्या प्रचलित दरानुसार पुढील पाच वर्षे देखभालीसाठी देण्यात येऊन येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६९० विषय क्रमांक - ३३
दिनांक - २८/६/२०१२
सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे
संदर्भः-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा ( सेवाभरती व सेवांाचे वर्गीकरण) निय-२०१० ( मा.विधी समिती ठराव क्र. १५०,१५१ दि.८/१२/२०१० व मा.महापालिका सभा ठराव क्र. १११३ दि.१८/३/२०११ ) चे परिशिष्ट-३ अ (नियम-३) मध्ये प्रशासकीय सेवा अंतर्गत येणारे संवर्ग नमूद केलेले असून त्यामध्ये लिपिक हा संवर्ग असून लिपिक संवर्गात येणारी पदे त्यामध्ये लिपिक टंकलेखक/माहिती नोंदणीकार लिपिक/लिपिक/लेखा लिपिक/रोखपाल/भांडारपाल/लेजर क्लार्क/स्टोअर किपर/दुरध्वनी चालक/समयलेखक इत्यादींचा समावेश करणेत आलेला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मध्ये संवर्गाची व्याखा अशी की संवर्ग म्हणजे एक स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेली, एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील पदसंख्या अशी आहे. म्हणजेच लिपिक पद हा संवर्ग आहे. याबाबत मा.विधी समिती ठराव क्र. २१ दि.१८/०५/२०१२ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तरी वेतनातील तफावत दूर करणेकामी एक लिपिक दुस-या लिपिकाचे तो प्रशासकीय सेवेच्या यादीतील लिपिक असो किंवा लेखा सेवेतील लिपिक यादीतील असो असे उदाहरण घेवून वेतन तफावत दूर करणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

ठराव क्रमांक -६९१ विषय क्रमांक - ३४
दिनांक - २८/६/२०१२
सुचक :- मा.निता पाडळे अनुमोदक :- मा. सुषमा तनपुरे
संदर्भः-मा.निता पाडळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-

श्री.नारायण तुकाराम गव्हाणे यांस ग्राऊंडमन यापदी र.रु. दहा हजार एकत्रीत मानधनावर सहा महीने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(जगदीश शेट्टी)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/९५५/२०१२
दिनांक - २९/०६/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.